# छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन,







फाल्गुन प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या, देव, देश आणि धर्मासाठी दिलेल्या बलिदाना च्या स्मृतींचा सप्ताह म्हणुन ७ मार्च ते २१ मार्च दरम्यान लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये स्वराज्य रक्षक, धर्मरक्षक छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयटीआय मधील विविध वर्कशॉप ची स्वच्छता मोहीम, आयटीआय परिसराची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. माननीय प्राचार्य श्री योगेश गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजी महाराज व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २१ मार्च २०२३ रोजी बलिदान सप्ताहाचा समारोप करण्यात आला त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य माननीय योगेश गायकवाड सर यांच्या निर्देशानुसार निदेशिका संध्याराणी शिंदे मॅडम ह्या व्यासपीठावरती उपस्थित होत्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री संभाजी जाधव सर यांनी केले. श्री रमेश लवटे सर यांनी आभार प्रदर्शन केले तसेच व्यासपीठावर राहुल दहीटनकर सर,कोरे मॅडम, राठोड सर व आयटीआय मधील ८० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.